# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

**मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेच्या निकालानंतर राज्यमंडळ स्तरावर नियुक्त केलेल्या समुपदेशकांची समुपदेशन सेवा सुरू ठेवण्याबाबत...**

## प्रकटन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेली माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) ची लेखी परीक्षा दि. ०१/०३/२०२४ ते दि. २६/०३/२०२४ या कालावधीत पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या विभागीय मंडळांमार्फत आयोजित करण्यात आली होती.

सदर परीक्षेचा निकाल दि. २७/०५/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे. निकालानंतर काही विद्यार्थी नकारात्मक विचाराने मानसिक दडपणाखाली येण्याची शक्यता असते. राज्यमंडळ स्तरावरुन अशा विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी ऑनलाईन समुपदेशन सेवा सुरू ठेवण्यात येत आहे. सदर समुपदेशकांचे भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहेत.

१) ७३८७४००९७० २) ९०११८४२४२ ३) ८४२११५०५२८ ४) ८२६३८७६८९६
५) ८३६९०२१९४४ ६) ८८२८४२६७२२ ७) ९८८१४१८२३६ ८) ९३५९९७८३१५
९) ७३८७६४७९०२ १०) ९०११३०२९९७

उपरोक्त भ्रमणध्वनी क्रमांक दिलेले समुपदेशक परीक्षेच्या निकालाच्या दिवसापासून ८ दिवस सकाळी ८-०० ते रात्री ८-०० या वेळेत विद्यार्थ्यांना भ्रमणध्वनीव्दारे निशुल्क आवश्यक ते समुपदेशन करतील याची विद्यार्थी, पालक यांनी नोंद घ्यावी.

दिनांक:- २७/०५/२०२४

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

---

क्र. कोविमं./आस्थापना/628A
दिनांक : २८/०५/२०२४

प्रति,
सर्व मुख्याध्यापक,
माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

उपरोक्त प्रकटन आपल्या शाळेच्या नोटीस बोर्डावर लावावे. तसेच ते आपल्या शाळेच्या प्रत्येक विद्यार्थ्यास निदर्शनास आणावे. कोणताही विद्यार्थी सदर माहितीपासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर